**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**सभावृत्तांत**
**कार्यपत्रिका क्र.९**

दिनांक :- १८/०२/२०१३ वेळ :-दु. २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दिनांक १८/०२/२०१३ रोजी दु. २.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. भोंडवे मोरेश्वर महादू | सदस्य |
| ६. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ७. | मा. लोंढे गणेश नारायण | सदस्य |
| ८. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ९. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| १०. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| ११. | मा. डोके अपर्णा निलेश | सदस्य |
| १२. | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| १३. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १४. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १५. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १६. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १७. | मा. कदम सदगुरु महादेव | सदस्य |
| १८. | मा. आसवानी सविता धनराज | सदस्य |
| १९. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |
| २०. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य. अभियंता मकरंद निकम, शरद जाधव, रामदास जाधव, ए.ए.पठाण, प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत, सुरेश आव्हाळे लेखाधिकारी, उपअभियंता, एम. एम. चव्हाण, एस. एन.वाघुंडे, व्ही.एन.देसले, के.एस.महाजन, सहा. आरोग्याधिकारी, जे.एस. जानकर, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

मागील सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला. (माहे जानेवारी १३)

तसेच सदर सभेत मा. प्रभाग अध्यक्षा यांचेकडे मा. प्रभाग अधिकारी यांनी ब प्रभागाचे अंदाजपत्रक सादर केले.

प्रशासन अधिकारी (सभाशाखा) ब प्रभाग समिती यांनी विषयपत्राचे वाचन केले. तदनंतर मा. अध्यक्षांचे परवानगीने खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेतले.

विषय क्र. ३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

नांमकरणाबाबत.

- कै. शैलजा श्यामराव खाडे या चांगल्या सामाजिक कार्यकर्त्या होत्या. मागील वर्षी त्यांचे निधन झालेने म्हाडा कॉलनीतील अंतर्गत रस्त्याला त्यांचे नांव देणेत यावे.
- मोरवाडी सर्कल जवळील चौकास सम्राट चौक असे नांव देणेत यावे.

विषय क्र. ४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्र.क्र.२७ मधील लिंगायत स्मशान भूमीमधील वेटींग शेड पाडणेबाबत.

मोरवाडी येथील लिंगायत स्मशानभूमीमध्ये असलेले वेटींगशेड मोडकळीस आले असून त्याचे व वॉचमन केबिनचे दुरावस्थेमुळे वापर होत नाही तरी स्मशानभूमीमधील वेटींग शेड व वॉचमन केबिन पाडणेत यावे.

विषय क्र. ५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

नांमकरणाबाबत.

प्रभाग क्र. २१ दळवीनगर येथील समर्थ कॉलनी स.नं.१६४ मधील उद्यानास श्री गणेश बाग अस नांमकरण करण्यात यावे.

विषय क्र. ६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

नांमकरणाबाबत

केशवनगर शाळे समोरील दळवींची टपरी असलेल्या कॉलनीला श्री स्वामी समर्थ कॉलनी नांव दयावे.

विषय क्र. ७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

नांमकरणाबाबत

प्रभाग क्र २३, केशवनगर, चिंचवड या भागाचे मी प्रतिनिधित्व करित असून सदरच्या प्रभागामध्ये महानगरपालिकेने भूसंपादन करुन मोकळी जागा ताब्यात घेऊन सदरच्या जागेमध्ये नवीन इमारत बांधली असून त्या इमारतीचा वापर रुग्णालयासाठी होणार आहे.

स्त्री शिक्षणाचे महत् काम करणा-या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या उत्तुंग कार्याची आठवण चिरकाळ जनमाणसात रहावी या उद्देशाने रुग्णालयाच्या या नवीन इमारतीस क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय असे नांमकरण करणेस मान्यता मिळावी.

विषय क्र.८ विभाग : आरोग्य विभाग, ब प्रभाग

विषय – तरतुद वर्गीकरणाबाबत.

ब प्रभाग कार्यालयाचे सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकात आरोग्य विभागाकडील "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर र.रु. १७,००,००,०००/- इतकी तरतुद करणेत आली होती. सदर रकमेतून दि. ३१/०१/२०१३ अखेर १३,७८,५६,३९७/- इतकी रक्कम खर्च करणेत आलेली आहे. उर्वरित र.रु. ३,२१,४३,६०३/- एवढी शिल्लक आहे.

ब प्रभाग कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील "घंटागाडी ठेकेदार खर्च " या लेखाशिर्षावर सन २०१२-१३ करीता तरतुद र.रु. ७५,००,०००/- करणेत आली होती. सुधारीत अंदाजपत्रकात सदर लेखाशिर्षावर ७०,६८,०००/- अशी तरतुद करणेत आलेली आहे. तथापि सदर लेखाशिर्षावर सुधारित तरतुद अपूरी पडणार आहे. दि. ५/२/२०१३ अखेर ७१,०३,३५०/- असा खर्च झालेला आहे. माहे फेब्रु. २०१३ चे घंटागाडी ठेकेदारांचे मानधन बील अदा करणे बाकी आहे. "घंटागाडी ठेकेदार खर्च" या लेखाशिर्षावर अंदाजे र.रु. ८,००,०००/- "स्थायी अस्थापना", आरोग्यविभाग या लेखाशिर्षावरुन वर्ग करणेत यावे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली करता येत असल्याने सदरचा विषय मा. प्रभाग समीती पुढे निर्णयार्थ ठेवणेत यावा.

ठराव क्र. ८४ विषय क्र.१

दि. १८/०२/२०१३ विभाग : पाणीपुरवठ विभाग, ब प्रभाग.

सुचक : मा. ओव्हाळ शेखर अशोक अनुमोदक: मा. भोंडवे मोरेश्वर महादू

संदर्भ : क्र. पापु/बप्र/४३/२०१३, दि.४/०२/२०१३ रोजीचे पत्र.

मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पुनावळे येथील तलाठी ऑफीस शेजारी शाळेच्या आवारातील जुनी पाण्याची टाकी पाडणेबाबत.

पुनावळे गांव मनपामध्ये सन १९९७ मध्ये समाविष्ट झालेले आहे. त्यावेळी पुनावळे गावातील पाणीपुरवठा बोअरवेलव्दारे करणेत येत होता. त्यापैकी पुनावळे येथील प्राथमिक शाळेजवळील बोअरवेलवर विद्युत पंप बसवून जमिनीवर दगडी बांधकामाने बांधलेल्या पाण्याच्या टाकीमध्ये पाण्याचा साठा करुन त्यामधून काढलेल्या सार्वजनिक नळामधून पाणी पुरवठा करणेत येत होता. JNNURM अंतर्गत स.नं. १२ पुनावळे येथे १.५ द.ल.लि. क्षमतेची पाण्याची उंच टाकी बांधून त्यामार्फत पाणी पुरवठा चालु करणेत आला असून सद्यस्थितीत त्या दगडी टाकीचा वापर होत नाही. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची दि.१६/०१/२०१३ रोजी पुनावळे येथील स्थानिक नगरसदस्य यांचे समवेत या भागातील पाहणी करताना सदर शाळेच्या प्रांगणामध्ये सदर वापरात नसलेली टाकी पाडून शाळेसाठी ग्राउंड करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. सदर टाकी पाडणेचा कालावधी १ महिनेचा देणेत आलेला आहे. सदरचे कार्यवाहीस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ८५ विषय क्र.२
दि. १८/०२/२०१३ विभाग : लेखा विभाग, ब प्रभाग
सुचक: मा. शमीम पठाण अनुमोदक: मा. चिंचवडेपाटील अश्विनी गजानन
संदर्भ : क्र. बप्र/लेखा/८/कावि/८४/२०१३, दि.८/२/२०१३ रोजीचे पत्र.

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

ब प्रभाग कार्यालयाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-२०१४ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) मधील पोट कलम (७) चे पोटकलम (ब) नुसार मान्यता देणेत आली. तसेच सदरचा विषय कायम होणेची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ८६ विषय क्र.३
दि. १८/०२/२०१३ विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
सुचक: मा. साळुंके सविता सुरेश अनुमोदक: मा. पालांडे सुजाता सुनिल
संदर्भ : मा. साळुंके सविता सुरेश यांचे दि.१८/२/२०१३ रोजीचे पत्र.

मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

नांमकरणाबाबत.

- कै. शैलजा श्यामराव खाडे या चांगल्या सामाजिक कार्यकर्त्या होत्या. मागील वर्षी त्यांचे निधन झालेने म्हाडा कॉलनीतील अंतर्गत रस्त्याला त्यांचे नांव देणेत यावे.
- मोरवाडी सर्कल जवळील चौकास सम्राट चौक असे नांव देणेत यावे.

नांमकरणास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ८७ विषय क्र.४
दि. १८/०२/२०१३ विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
सुचक: मा. साळुंके सविता सुरेश अनुमोदक: मा. पालांडे सुजाता सुनिल
संदर्भ : मा. साळुंके सविता सुरेश यांचे दि.१८/२/२०१३ रोजीचे पत्र.

मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्र.क्र.२७ मधील लिंगायत स्मशान भूमीमधील वेटींग शेड पाडणेबाब.

मोरवाडी येथील लिंगायत स्मशानभूमीमध्ये असलेले वेटींगशेड मोडकळीस आला असून त्याचा व वॉचमन केबिनचे दुरावस्थेमुळे वापर होत नाही तरी स्मशानभूमीमधील वेटींग शेड व वॉचमन केबिन पाडणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ८८ विषय क्र.५
दि. १८/०२/२०१३ विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
सुचक: मा. शमीम पठाण अनुमोदक: मा. नेटके सुमन राजेंद्र
संदर्भ :मा. शमीम पठाण यांचे दि.१८/२/२०१३ रोजीचे पत्र.

मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

नांमकरणाबाबत.

प्रभाग क्र. २१ दळवीनगर येथील समर्थ कॉलनी स.नं.१६४ मधील उद्यानास श्री गणेश बाग असे नांमकरण करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ८९ विषय क्र.६
दि. १८/०२/२०१३ विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
सुचक: मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक: मा. लोंढे गणेश नारायण
संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि.१८/२/२०१३ रोजीचे पत्र.

मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

नांमकरणाबाबत

केशवनगर शाळेसमोरील दळवींची टपरी असलेल्या कॉलनीला श्री स्वामी समर्थ कॉलनी असे नांव देणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ९०
दि. १८/०२/२०१३
सुचक: मा. अपर्णा निलेश डोके
संदर्भ : मा. अपर्णा निलेश डोके यांचे दि.०४/२/२०१३ रोजीचे पत्र.
मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

विषय क्र.७
विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
अनुमोदक : मा. लोंढे गणेश नारायण

नांमकरणाबाबत

प्रभाग क्र २३, केशवनगर, चिंचवड या भागाचे मी प्रतिनिधित्व करित असून सदरच्या प्रभागामध्ये महानगरपालिकेने भूसंपादन करुन मोकळी जागा ताब्यात घेऊन सदरच्या जागेमध्ये नवीन इमारत बांधली असून त्या इमारतीचा वापर रुग्णालयासाठी होणार आहे.

स्त्री शिक्षणाचे महत् काम करणा-या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या उत्तुंग कार्याची आठवण चिरकाळ जनमाणसात रहावी या उद्देशाने रुग्णालयाच्या या नवीन इमारतीस क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय असे नांव देणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ९१
दि. १८/०२/२०१३
सुचक: मा. पानसरे अमिना मोहंम्मद
संदर्भ : क्र.बप्र/७/कावि/१०८अ/२०१३ दि.१८/२/२०१३ रोजीचे पत्र.
मा. प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

विषय क्र.८
विभाग : आरोग्य विभाग, ब प्रभाग
अनुमोदक : मा. पालांडे सुजाता सुनिल

विषय – तरतुद वर्गीकरणाबाबत.

ब प्रभाग कार्यालयाचे सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रकात आरोग्य विभागाकडील "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर र.रु. १७,००,००,०००/- इतकी तरतुद करणेत आली होती. सदर रकमेतून दि. ३१/०१/२०१३ अखेर १३,७८,५६,३९७/- इतकी रक्कम खर्च करणेत आलेली आहे. उर्वरित र.रु. ३,२१,४३,६०३/- एवढी शिल्लक आहे.

ब प्रभाग कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील "घंटागाडी ठेकेदार खर्च " या लेखाशिर्षावर सन २०१२-१३ करीता तरतुद र.रु. ७५,००,०००/- करणेत आली होती. सुधारीत अंदाजपत्रकात सदर लेखाशिर्षावर ७०,६८,०००/- अशी तरतुद करणेत आलेली आहे. तथापि सदर लेखाशिर्षावर सुधारित तरतुद अपूरी पडणार आहे. दि. ५/२/२०१३ अखेर ७१,०३,३५०/- असा खर्च झालेला आहे. माहे फेब्रु. २०१३ चे घंटागाडी ठेकेदारांचे मानधन बील अदा करणे बाकी आहे. "घंटागाडी ठेकेदार खर्च" या लेखाशिर्षावर अंदाजे र.रु. ८,००,०००/- "स्थायी अस्थापना", आरोग्यविभाग या लेखाशिर्षावरुन वर्ग करणेत यावे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली करता येत असल्याने सदरचे विषयास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

मा. अध्यक्षा यांनी पुढील प्रमाणे मान्यता दिली.

<u>माहे जानेवारी २०१३ चे सभेचे ठराव खालील प्रमाणे टाईप झालेले आहेत</u>.

ठराव क्र. ८२
दि. १६/०१/२०१३
सुचक: मा. पवार यमुनाताई रमणनाना
संदर्भ : मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांचे दि.१६/०१/२०१३ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

विषय क्र.७
विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
अनुमोदक : मा. शमीम पठाण

ब प्रभागांतर्गत सर्व प्रभागात डांसांचे प्रमाण खुप वाढत आहे. त्यासाठी धुरीकरण करण्यासाठी दोन रिक्षा टेंम्पो वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यास मान्यता देणेत आली

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ८३ विषय क्र.८
दि. १६/०१/२०१३ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक: मा. भोंडवे संगिता राजेंद्र अनुमोदक: मा. चिंचवडेपाटील अश्विनी गजानन
संदर्भ : मा. भोंडवे संगिता राजेंद्र यांचे दि.१६/०१/२०१३ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

ब प्रभागांतर्गत सर्व प्रभागात डांसांचे प्रमाण खुप वाढत आहे. त्यासाठी धुरीकरण करण्यासाठी दोन रिक्षा टेंम्पो वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यास मान्यता देणेत आली ठराव ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

सदरचे ठराव क्र. ८२ व ठराव क्र. ८३ दि. १६/०१/२०१३ हे खालीलप्रमाणे वाचण्यात यावेत.

ठराव क्र. ८२ विषय क्र.७
दि. १६/०१/२०१३ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक: मा. पवार यमुनाताई रमणनाना अनुमोदक: मा. शमीम पठाण
संदर्भ : मा. पवार यमुनाताई रमणनाना यांचे दि.१६/०१/२०१३ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

ताथवडे येथे मलनि:सारण व्यवस्था करणेसाठी उदंचनगृह बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी ताथवडे येथील स.न. २ मधील श्रीमती शारदा ज्ञानोबा जाधव, अशोक लक्ष्मण सोनावणे व इतर जागा मालक शासनाच्या दरांप्रमाणे १० आर जागा देणेस तयार आहेत.

तरी ताथवडे येथील स. न. २ मधील १० आर जागा मैलापाणी उदंचनगृह बांधणेसाठी शासन दराप्रमाणे ताब्यात घेणेस ब प्रभाग समिती मार्फत मा. स्थायी समितीची मान्यता घेणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. ८३ विषय क्र.८
दि. १६/०१/२०१३ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक: मा. भोंडवे संगिता राजेंद्र अनुमोदक: मा. चिंचवडेपाटील अश्विनी गजानन
संदर्भ : मा. भोंडवे संगिता राजेंद्र यांचे दि.१६/०१/२०१३ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

स्त्रीयांचे व पुरुषांचे शौचालय दुरुस्ती करणेबाबत शौचालयातील भांडी व दरवाजे खराब झालेले आहेत व काही दरवाजे तुटलेले आहेत. कडी-कोयंडे तुटलेले आहेत. बरेच काही भांडी बंद अवस्थेत आहेत. तरी शौचालयात नविन भांडी टाकणे व दरवाजे तुटलेले आहेत ते नविन बसवून मिळावे.

तसेच वाल्हेकरवाडी येथील ड्रेनेज पंप हाऊस येथील चेंबर तुटलेले आहेत व ते सारखे चेंबर ओव्हर फुल होऊन पाणी बाहेर येऊन दुर्गंधी पसरते व शेतामध्ये पाणी साचुन शेतीचे नुकसान होते व पंप हाऊस जवळ नविन लाईन जोडली आहे. तेथील चेंबर दुरुस्त करावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही /-
[ ठाकरे मंदाकिनी अर्जुन ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,
सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

क्र. एएमसी/बप्र२/कावि/ ४६२/२०१३, दि.२५/०२/२०१३